प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
आदेश क्रमांक : ३२४ सन २०२५, दिनांक :२०/०९/२०२५

पहा:- १) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र बी (जन) ५६०१/५७/२०२४/१६९७, दिनांक १३/०९/२०२४.
२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक २९६/२०२५, दिनांक २९.०८.२०२५.
३) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ३०२/२०२५, दिनांक ०२.०९.२०२५.
४) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ३०३/२०२५, दिनांक ०२.०९.२०२५.
५) दिनांक १९.०९.२०२५ रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील पारीत आदेश.
६) मा. सल्लागार समितीचा निर्णय दिनांक १९.०९.२०२५.

उपरोक्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे संदर्भ क्र. ०१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर शिपाई पदाची निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०२ ते ०४ अन्वये या न्यायीक जिल्हयाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या शिपाई पदाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्रमांक ०५ व ०६ अन्वये नियुक्ती व स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
*०१	श्री. एस.जे.देवकर, शिपाई / पहारेकरी, दिवाणी न्यांयाधीश कनिष्ठ स्तर, शेगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे न्यायालयात शिपाई या पदाच्या निवड यादी वरील उमेदवार कु. एस.यु.खंदारे हया रुजु न झाल्याने त्यांचे रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन.
०२	श्री. अमोल भास्करराव देशमुख, शिपाई पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ३६ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, शेगांव यांचे आस्थापनेवर श्री. एस.जे.देवकर यांचे पदी शिपाई / पहारेकरी म्हणुन नविन नियुक्ती.
०३	श्री. दिपक शांताराम खंडारे, शिपाई पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ३७ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, लोणार यांचे आस्थापनेवर श्री. के.जे.दळवी यांचे पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०४	श्री. मारोती दत्ता चाटे, शिपाई पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ३८ वरील उमेदवार.	सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मेहकर यांचे आस्थापनेवर श्री. एस.जी.काळे यांचे पुर्वीचे रिक्त पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.

स्थलांतरीत कर्मचारी यांनी आपले पदाचा कार्यभार दिनांक २२.०९.२०२५ रोजीचे मध्यान्हानंतर द्यावा व आपले नुतन पदी पदग्रहण अवधी न घेता दिनांक २३.०९.२०२५ रोजीचे मध्यान्हापूर्व रुजू व्हावे.

सदर्हु आदेश हा नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी दिनांक २३.०९.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.

नवनियुक्त उमेदवार यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक २३.०९.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वला किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आत त्यांनी त्यांचे शिपाई पदी रुजु व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश हा रद्द करण्यात येईल.

उपरोक्त सन २०२३ चे शिपाई पदाची निवड यादीतील उमेदवारांची वेतननिश्चिती एस-१, वेतन बॅण्ड १५०००-४७६००/- या सुधारीत संरचनेत रुपये १५०००/- या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवारांनी कामावर रुजु झाल्यानंतर त्यांचे तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावी. तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

संबंधित पिठासीन अधिकारी यांना असेही सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे त्यांच्या आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन घेवून व महाराष्ट्र शासन, सामान्य

प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८.०८.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना दोन प्रतीत घेण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा न्यायालयास पाठवावे.

उमेदवारांनी चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबतचे साक्षांकन नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळुन आल्यास निर्गमित करण्यात आलेले तात्पुरते नियुक्तीपत्र हे रद्दबातल करुन भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल व निवड यादीवरुन नाव कमी करण्यात येईल.

उपरोक्त उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी शिपाई पदावर कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पुरुष कर्मचाऱ्यांनी साधा पांढरा शर्ट, पांढरी पँन्ट व गांधी टोपी परिधान करणे अनिवार्य राहील.

(*) स्वेच्छेने स्थलांतर करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामामध्ये हलगर्जीपणा तथा निष्काळजीपणा आढळून आल्यास व प्रशासनास आवश्यकता भासल्यास, त्यांचे स्थलांतर इतरत्र कोठेही व केव्हाही होवू शकते, त्यांना "*मी आत्ताच बदलुन आलेलो आहे, माझी बदली पुढील पाच वर्षांपर्यंत होवु नये*" असे म्हणण्याचा अधिकार राहणार नाही तसेच त्यांचे स्थलांतर विनंती अर्जानुसार करण्यात आल्यामुळे त्यांना प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

R/cade
20/09/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक /आस्था./4306 /२०२५, दिनांक : २०/०९/२०२५
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव / मेहकर.

०२. २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव.

०३. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, शेगांव / लोणार.

०४. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मेहकर.

०५. श्री. अमोल भास्करराव देशमुख, रा. मु. पळशी खुर्द, पो. पळशी बु., ता. खामगांव जिल्हा बुलडाणा ४४४ ३०३. (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०६. श्री. दिपक शांताराम खंडारे, रा. मु.पो. तळेगांव बु. (बाजार), हनुमानजी मंदीराजवळ, ता. तेल्हारा, जिल्हा अकोला ४४४ १०३. (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०७. श्री. मारोती दत्ता चाटे, रा. मु.पो. गांधारी, ता. लोणार, जिल्हा बुलडाणा ४४३ ३०२. (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०८. अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०९. सहायक अधिक्षक (आस्थापना / वित्त व लेखा विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

१०. वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / सेवानिवृत्ती प्रकरणे / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

११. अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.

१२. सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

१३. कार्यालय प्रत.